# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 26.03.2026 वार- गुरुवार

---

**केरोसीन**

आखाती देशांतील युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन, राज्य सरकारने पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणास गती देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार शिधापत्रिका असलेल्यांना कुटुंबांना प्रत्येकी ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंबही केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. केरोसीनचे दर राज्य सरकारकडून स्वतंत्रपणे जारी केले जाणार आहेत. अन्न, आणि नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित करण्यात आलं आहे. किरकोळ केरोसीन परवानाधारक आणि रास्तभाव दुकानांच्या माध्यमातून नागरिकांना केरोसीन वितरीत केलं जाईल. एकंदर वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात देण्याचे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत.

**रामनवमी**

श्रीरामनवमीचा सण आज पुण्यात सर्वत्र अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. तुळशीबागेतील श्रीराम मंदिरासह विविध श्रीराम मंदिरांमध्ये आज राम जन्मोत्सव सोहळा भक्तीभावाने साजरा झाला.

तुळशीबागेतील श्रीराम मंदिरात आज पहाटे पासून अभिषेक, पूजा, भजन कीर्तन आदि धार्मिक कार्यक्रम आणि त्यानंतर दुपारी बारा वाजता फुलांची उधळण करत राम जन्मोत्सव अत्यंत उत्साहात साजरा झाला. सर्वच मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. मंदिरात फुलांची सजावट आणि दिव्यांची आरासही करण्यात आली. संध्याकाळी विविध संस्था संघटनांच्या वतीनं पालखी, मिरवणुका, दुचाकी फेरी यासह अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**पुणे विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सर सी. व्ही. रमण सभागृहात डॉ. वसंत गोवारीकर स्मृती व्याख्यान काल झालं. अहमदाबाद इथल्या स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटरचे माजी संचालक प्रमोद काळे यांचं यावेळी व्याख्यान झालं. “डॉ. वसंत गोवारीकर : भारताला अवकाशात प्रवेश मिळवून देणारे दूरदर्शी तंत्रज्ञ” या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं. यावेळी काळे यांनी डॉ. गोवारीकर यांच्या अवकाश क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांच्या प्रशासकीय आणि संस्थापक नेतृत्वाचा प्रवासही उलगडून सांगितला.

**सभापती**

पुणे जिल्हा परिषदेतील विषय समित्यांच्या नवीन सभापतींची निवड येत्या २ एप्रिल रोजी होणार आहे. त्यासाठीचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जाहीर केला.

या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून हवेलीचे प्रांताधिकारी यशवंत माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**जिल्हापरिषद शाळा**

पुणे जिल्हा परिषदेकडून जिल्ह्यात आदर्श शाळा आणि आदर्श प्राथमिक आरोग्य केंद्र तयार केली जात आहेत. जास्त पटसंख्येच्या शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करणं, त्याचबरोबर जिल्ह्यातील ४० प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ३०० शाळांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याचा मानस आहे, असं जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी सांगितलं.

**राष्ट्रवादी कॉँग्रेस**

महिलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुण्यात जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली. पक्षाचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या उपस्थितीत महात्मा फुले वाड्यातून हे अभियान सुरू झालं. नाशिकच्या भोंदू बाबा खरातकडून होणाऱ्या शोषणाविरोधात लढा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करत महिलांनी अशा प्रवृत्तींपासून सावध राहण्याचं आवाहनही करण्यात आलं.

**अरुणकुमार वैद्य**

माजी लष्करप्रमुख जनरल अरूणकुमार वैद्य यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि ऑलिव्ह ग्रीन फाऊंडेशन यांच्यातर्फे न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग इथं वैद्य यांचं भित्तीचित्र लावण्यात येणार आहे. तसंच वर्षभरात विविध उपक्रमही आयोजित करण्यात येणार आहेत. ऑलिव्ह ग्रीन फाऊंडेशनचे कर्नल अवधूत ढमढेरे यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल उचललं आहे. प्लास्टिक कचरा संकलनासाठी अत्याधुनिक वाहन महापलिकेला देण्यात आलं आहे. स्थानिक समुदायाच्या सक्रिय सहभागातून प्लास्टिक कचऱ्याचं संकलन, वर्गीकरण आणि पुनर्वापर अधिक परिणामकारक करण्याच्या उद्देशानं सुरू असलेल्या प्रकल्पा अंतर्गत ही वाहनं देण्यात आली. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेतर्फे हा प्रकल्प राबावला जात आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 20 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या तापमानात किंचित घट होण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**